**B.Voc Printing & Publishing**
**Best Practices**

महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त) येथे दि. २१, २२ व २३ डिसेंबर रोजी भव्य प्रिंटींग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सन २०१८ मध्ये महाविद्यालयात सुरु झालेल्या बी. व्होक विभागामध्ये प्रिंटींग अँड पब्लिशिंग, ॲग्रीकल्चर व ऑटोमोबाईल हे विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त व शिवाजी विद्यापीठाच्या पदवीच्या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा वाढता कल आहे. या विभागामार्फत व कोल्हापूर जिल्हा मुद्रक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने PAPEX 360° या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

14 व्या शतकामध्ये सुरू झालेल्या मुद्रण क्षेत्राने आजचे मानवी आयुष्य संपूर्ण व्यापलेले आहे. जर्मनी मध्ये सुरू झालेल्या जोहान्स गुटेनबर्ग यांच्या सामान्य मुद्रण कलेने सुरू केलेल्या या प्रवासाने आजच्या डिजिटल प्रिंटींगच्या स्वरूपातील अथांग आकाशामध्ये भरारी घेतली आहे. अगदी लेटर प्रेसपासून सुरू झालेला हा प्रवास आजच्या क्षणार्धात उपलब्ध होणाऱ्या डिजिटल प्रिंटपर्यंत केलेला आहे.

या क्षेत्रातील बहुतांश स्वरूपातील उपलब्ध असलेल्या संधींची माहिती लोकांना ज्ञात नसते. यादरम्यान विविधांगी व्यवसायाचे मार्ग व त्यातून निर्माण होणाऱ्या नोकरीच्या संधींची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात येणार आहे. तसेच क्षेत्राशी निगडित तांत्रिक बारकावे, संबंधित समस्या यांचे मार्गदर्शनपर संवादाचे देखील आयोजन प्रदर्शनानिमित्त करण्यात येणार आहे.

या प्रदर्शनामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्रिंटींग क्षेत्राशी निगडीत नामवंत मुद्रक सहभागी होणार आहेत. या प्रदर्शनाचे आयोजन आचार्य

विद्यानंद संस्कृती भवन येथे केले असून याचे उद्घाटन दि. २१ डिसेंबर रोजी श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे यांच्या हस्ते व संस्थेचे सेक्रेटरी श्री. मोहन गरगटे, खजानीस श्री. गुणवंत रोटे, कोल्हापूर जिल्हा मुद्रक संघाचे अध्यक्ष श्री. संजय थोरवत यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये होणार आहे.

या पत्रकार परिषदेला कोल्हापूर जिल्हा मुद्रक संघाचे अध्यक्ष श्री. संजय थोरवत, श्री. प्रकाश करंबळकर, श्री. अंजुम तांबोळी व श्री. संजय रणदिवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, बी.व्होक विभागाचे समन्वयक डॉ. संदीप नलवडे यांनी दिली. याप्रसंगी प्रा. विनय बिरंजे, प्रा. काजल भोसले, प्रा. दिपक चौगले व इतर प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत.



उद्धघाटन प्रसंगी संस्थेचे चेअरमन आणि कोल्हापूर मुद्रक संघाचे अध्यक्ष, संचालक मंडळ



